NAVJYOT / Vol. XV / Issue – I ISSN 2277-8063

# पर्यावरण रक्षणातुन पर्यटन विकास : विशेष संदर्भ पश्चिम घाट – चंदगड वनपरिक्षेत्र

**प्रा. बाबली गंगाराम गावडे**, सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, र..भा.माडखोलकर महाविद्यालय, चंदगड
मो. न. – 9021917074 Emall ID - babaligawade78@gmail.com

---

**प्रस्तावना –**

स्वच्छ आणि सुंदर पर्यावरण पर्यटनवृध्दीसाठी आवश्यक असते, त्यामुळे त्या परिसराचा आर्थिक विकास साधला जातो चंदगड तालुक्याचा विचार करता पश्चिम घाटामध्ये समाविष्ठ असुनही व विपुल जैवविविधता आहे, तरीही हा तालुका अतिमागास व दुर्गम भाग म्हणून ओळखला जातो. याचे कारण ग्रामीण व डोंगराळ भाग, पायाभूत सुविधांचा अभाव व शासनाचे दुर्लक्ष हेच आहे. येथील भौगोलिक विविधतेचा अभ्यास करता समृध्द निसर्ग, ऐतिहासिक गडवैभव, प्राचीन मंदिरे, उत्खनित बॉक्साईटचे साठे, पावसात प्रवाहीत होणारे नैसर्गिक धबधबे, धरणे - जलाशये, चंदगडी काजू (White Gold) नद्या. तसेच झांबरे या गावापासुन जंगलात २० कि.मी. अंतरावर "पाण्याचे वगळ" या नैसर्गिक अधिवासात तयार झालेले २५ ते ३० फुट खोल विवरे व सभोवती पठारी मैदाने त्या ठिकाणी कासच्या पठाराप्रमाणे विविध प्रकारची फुलझाडे विकसित करण्याची क्षमता असलेली मानवनिर्मित उद्याची पर्यटनस्थळे व सभोवती डोंगर रांगा हि पर्यटनदृष्य्या आकर्षणाची ठिकाणे आहेत. तसेच आंबोली, चौकुळ व तिलारी, चंदगड हा त्रिकोणी निसर्गसमध्द जैवविविधतेने नटललेला पश्चिम घाटातील पट्टा रस्ते बांधणीने जोडल्यास हि ठिकाणे पर्यटनाच्या टप्यांत येतील.

त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करत चंदगडचा ऐतिहासिक समृध्द निसर्ग वारसा पर्यटन दृष्ट्या विकसित केल्यास स्थानिकांना रोजगार आर्थिक विकास व पर्यावरणाचे जतन या तिनही गोष्टी साधता येतील. म्हणून चंदगड तालुक्यातील ऐतिहासिक नैसगिक अतिमहत्वाच्या ठिकाणांचा शोध घेऊन, त्यातील नाविन्यता जपत पर्यटनक्षेत्र म्हणून कसे विकसित करता येईल याचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केला आहे.

**चंदगड तालुक्याचे वैशिष्ट्यपूर्ण लोकजीवन-**

पूर्वेला कर्नाटक राज्य, पश्मिला सिंधुदूर्ग जिल्हा व दक्षिणेला गोवा राज्य असे चंदगड परिसराचे भौगोलिक स्थान आहे. जास्त पाऊस हे चंदगडचे वैशिष्टय आहे. येथील लोक, निसर्गानुकूल जीवन जगत होते. नैसर्गिक साधनसंपत्तीचा सिमित उपभोग ते करत. निसर्गातील प्राणी भौगोलिक स्थिति, वनौषधी व निसर्गाचे परंपरागत ज्ञान त्यांना होते. पावसाळी शेती व पशुपालन हे आर्थिक स्त्रोत होते. जंगल परिसरातील व्यक्तिंचा चरितार्थ मधसंकलन व रानमेवा विक्रितून होत असे. तालुक्यात जैवविविधता विपुल आहे, परंतू डोंगराळ, दुर्गम भाग असल्याने शाश्वत रोजगार शिक्षण, आरोग्याच्या सुविधांची कमतरता आहे. परिणामी तरुण रोजगारासाठी शहराकडे आकर्षित होत आहे हे वास्तव आहे. त्यामुळे चंदगडचा विकास, पर्यटन प्रकल्पाच्या माध्यमातुन करणे व शाश्वत रोजगार निर्माण करणे काळाची गरज आहे.

**पर्यटन वृध्दीसाठी नाविन्यपुर्ण उपक्रम**

दुर्गम व अतिमागास भाग म्हणून परिचित असलेली चंदगडची ओळख पुसण्यासाठी या परिक्षेत्रात असलेल्या जैवविविधतेचा व पर्यटनास आवश्यक असलेल्या सर्व अनुकूलतेचा योग्य वापर करून निसर्ग पर्यटन समृध्द करायचे आहे. तसेच ऐतिहासिक, सांस्कृतिक घडामोडींच्या नाविन्यांचा शोध घेऊन चंदगड तालुका पर्यटनाच्या माध्यमातून विकसित करायचा आहे. त्याकरीता खालील उपक्रम राबविणे गरजेचे आहे.

**पर्यावरणपुरक निसर्ग पर्यटन –**

या पर्यटनाच्या माध्यमातून निसर्गाचे जतन, स्थानिक संस्कृतीचे संवर्धन आणि शाश्वत विकासाला चालना देता येते. वन्यजीवांना कोणतीही इजा न पोहोचवता निर्सगाचा आस्वाद घेता येतो त्यासाठी पर्यटकांमध्ये पर्यावरण रक्षणाची जाणीव निर्माण केली पाहिजे.

आंबोली, चौकुळ तिलारीनगर- चंदगड या त्रिकोणी पट्टयाच्या नैसर्गिक विविधतेचा विचार करता, येथे निसर्ग पर्यटनास मोठी संधी आहे. पावसाळयात येथील परिसर हिरवाईने नटलेला असतो. समृध्द जंगले हे या परिसराचे वैशिष्टय आहे. आंबोलीचा धबधबा प्रसिध्द आहे, तर चौकुळ निसर्गभ्रमंती साठी उत्तम आहे. हाच पर्यटनाचा टप्पा तिलारी चंदगडकडे वळविल्यास येथे धरणे- जलाशयामध्ये बोटींग व जलपर्यटनास वाव आहे. तसेच येथील निसर्गरम्य ठिकाणे

NAVJYOT / Vol. XV / Issue – I ISSN 2277-8063

खोलदरी, धुके व वनराईने नटलेला स्वप्नवेल पॉईट आहे. तसेच घाटाच्या प्रारंभी नयनरम्य सनसेट पॉईट आहे, पश्चिमेकडे डोंगर रांगा आहेत.

चंदगडचा निसर्ग पर्यटकांना आकर्षित करतो. पर्यटनाला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी निसर्गस्नेही पर्यटनांवर भर देण्याची गरज आहे. त्यामुळे आंबोली ते चौकुळ मार्ग, पारगड-तिलारी या रस्त्यांची निर्मिती करणे व पारगडहून गोव्याला जाणारा मार्ग तयार करणे, हे शक्य झाल्यास, चंदगड तालुक्यातील पर्यटनस्थळे मुख्य रस्त्याला जोडली जातील. त्यामुळे पर्यटनास चालना मिळेल.

**चंदगडचा ऐतिहासिक वारसा –**

चंदगड भूमीत असलेले किल्ले हे केवळ इतिहासाचे साक्षीदार नसून, ते शौर्य, रणनिती आणि स्थापत्यकलेचे प्रतिक आहे. त्यामुळे या गडवैभवाचे जतन व संवर्धन होणे गरजेचे आहे. चंदगड तालुक्यात पारगड, गंधर्वगड, कलानिधीगड व महिपाळगड असे चार ऐतिहासिक महत्व लाभलेले किल्ले आहेत. प्रत्येक किल्ल्यांचे वेगळेपण आहे. काही किल्ल्यांवर लोकवस्ती आहे, परंतु उत्पन्नाचे साधन नाही. त्यामुळे रोजगारासाठी तरुण मुले पुणे - मुंबईकडे वळतात. त्यामुळे पर्यटनाच्या दृष्टीने या गडवैभवांचे सक्षमीकरण केल्यास किल्ले परिसरांतील ग्रामीण भागांचाही विकास होईल व ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल.

पावसाळयात किल्ल्यांवरून दिसणारे निसर्गरम्य दृश्य पर्यटकांना भुरळ घालत असते. त्यामुळे ट्रेकिंगच्या माध्यमातून इतिहास – प्रेमी निसर्गप्रेमी पर्यटक किल्ल्यांकडे आकर्षित होतात. त्याचप्रमाणे मंदिरे हि समृध्द संस्कृतीची प्रतिके आहेत. इब्राहिमपुर व भोगोली येथे प्रचीन जैन मंदिरे आहेत. आज त्यांची पुर्न:बांधणी होत आहे. परंतु पूर्वी या मंदिरामध्ये असलेली प्राचीन शिल्पकला व मंदिर बांधणीचे तंत्र अप्रतिम होते. त्यामुळे अनेक पर्यटक मंदिर रचना-तंत्र, स्थापत्यकला व मंदिराशी संबंधित असलेले उत्सव, परंपरा आणि लोकजीवन यांचा अभ्यास करण्यासाठी देश-विदेशातील पर्यटक व इतिहास अभ्यासक किल्ले व मंदिरांना भेट देतात. त्यामुळे पायाभूत सुविधांचा विकास करून हि स्थळे पर्यटनाच्या नजरेत आणली पाहिजेत.

**समृध्द निसर्ग : जैवविविधता पर्यटन प्रकल्प –**

पश्चिम घाट हा निसर्ग संपन्न आहे. निसर्गात विविध प्रकारच्या दुर्मिळ वनस्पती, पक्षी, फुलपाखरे यांची विपुलता आहे. दुर्मिळ व औषधी वनस्पती संशोधक व पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरते. समृध्द जंगल, मुबलक पाणी, आणि राहण्यासाठी अनुकूल परिस्थिती यामुळे हत्ती, गवे, बिबटे येथे स्थिरावले आहेत. मुबलक पाणी साठयामुळे हत्तींना मनसोक्त डुंबता येते. चंदगड वनक्षेत्रात वाघ, ब्लॅक पँथर, कोब्रा, नाग, अजगर यांचे अस्तित्व आहे. हि समृध्द जैवविविधतेची लक्षणे आहेत. समृध्द जंगल पर्यावरण समतोल राखण्यास मदत करते व समृध्द जंगले वन्यजीवांना अन्न आणि निवारा पुरवतात.

जांबरे मध्यम प्रकल्प व तालुक्यातील इतर धरण परिक्षेत्रातील जंगले घनदाट आहेत. परिणामी वृक्षसंपदेसह वन्यप्राण्यांची संख्या वाढली आहे. वन्यप्राणी व मानव संघर्ष वाढलेला आहे. शेती करणे दुरापास्त झाले आहे. त्यामुळे शासन स्तरावर व वनखात्यामार्फत हत्तीग्राम योजना, वन्यजीव अधिवास विकास, परिसंस्था पुर्नस्थापना, जनजागृती उपक्रम राबविले पाहिजेत.

निसर्ग पर्यटनासाठी जैवविविधता उद्यान उभारणे गरजेचे आहे. यामध्ये औषधी वनस्पती, दुर्मिळ वनस्पती यांचे योग्य जतन केले पाहिजे. डॉ. मधुकर बाचुळकर (वनस्पती तज्ञ) यांनी तिलारी परिक्षेत्रातील औषधी वनस्पतींची माहिती संकलित केली आहे. हि चंदगड वासीयांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. त्यामुळे पक्षी निरीक्षण केंद्र, औषधी वनस्पती उद्यान उभारल्यास या जैवविविधतेची माहिती पर्यटकांना होईल, यासाठी मार्गदर्शन व पर्यावरण जनजागृती महत्वाची आहे.

समृध्द जैवविविधतेमुळे जंगल सफारीसाठी मोठी संधी आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणुन तिलारीमधील ग्रीन-व्हॅली प्रकल्पाकडे पाहता येईल. वनखाते व कोदाळी ग्रामस्थांच्या पुढाकाराने हा प्रकल्प राबविला आहे. याव्दारे पर्यटकांना निसर्ग पर्यटन घडवून आणले जाते. त्यामुळे निसर्गप्रेमी पर्यटक येथे आकर्षित होतो. जांबरे मध्यम प्रकल्पापासून २० कि.मी. अंतरावर 'पाण्याचे वगळ' या जंगल परिसरात नैसर्गिकरित्या तयार झालेली सात ते आठ खोल विवरे २० ते २५ फुटापर्यंत आहेत. सभोवती मैदानी प्रदेश व डोंगर रांगा आहेत. या ठिकाणी कासच्या पठाराप्रमाणे रंगीबेरंगी फुलझाडे विकसित करता येते. यासाठी सौदर्यदृष्टी महत्वाची.... हा निसर्ग पर्यटकांना भूरळ घालू शकतो. कारण पायवाटेने जंगलातील रानमेव्याचा आस्वाद घेत त्या ठिकाणी पोहोचता येते, त्याव्दारे निसर्गभ्रमंतीही घडेल.

त्या ठिकाणी ''जंगल कॅम्बिंग'' पर्यटकांसाठी अनुकूल आहे. कारण चांदण्या रात्री प्राणी निरीक्षण, आकाश निरीक्षण जंगल परिक्षेत्रात राहूण करणे साहसी पर्यटकांसाठी आनंद देणारी गोष्ट आहे. परंतू यांसाठी सुरक्षेसाठी उंच मनोरा पाहिजे. याव्दारे प्राणी निरीक्षण करता येईल. तसेच समृध्द जंगलामध्ये विविध फुलझाडे आहेत. त्यावर आधारीत मधुमक्षिपालन केंद्र उभारल्यास व शासनस्तरावर आर्थिक सहाय्य व प्रशिक्षण केंद्र उभारल्यास ग्रामीण तरुणांच्या हाताला काम मिळेल व परिणामी शुध्द नैसर्गिक मध येथे मिळू लागल्यास पर्यटक येथे आकर्षित होतील.

**सांस्कृतिक पर्यटन प्रकल्प -**

स्थानिक लोकपरंपरा आणि लोककलेवर आधारीत दशावतार लोकनाट्य आणि शिगमोत्सव या दोन कला प्रकारांच्या माध्यमातून चंदगडचा विकास साधता येतो. त्यामुळे आपली संस्कृती, परंपरा, आणि लोकजीवन पर्यटकांना अनुभवयास मिळेल. याव्दारे लोककलेचा प्रसार सातासमुद्रापार होईल.

**दशावतार नाट्यकला -**

कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात लोकप्रिय असलेली ही कला धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचे प्रतिक आहे. भगवान विष्णुंच्या दहा अवतारांवर आधारित हि नाट्यकला ऐतिहासिकदृष्ट्या सादर केली जाते. पुरुष.... स्त्रीचे पात्र हुबेहुब साकारतो हे विशेष आहे. कोकणच्या अनेक तरुणांनी दशावतार कला जोपासण्यासाठी आपले उभे आयुष्य खर्ची केले आहे. अनेकांनी राष्ट्रीय पुरस्कार मिळविले आहेत. त्यामध्ये कै. बाबी नालंग (राजपात्र – राष्ट्रपती पुरस्कार विजेते), कै. बाबी कलिंगण (विनोदी पात्र), कै. सुधीर कलिंगण (लोकराजा), कै. प्रशांत मिस्त्री (स्त्री पात्र) यांचा उल्लेख करावा लागेल. दशावतार कलेचे मुळ सिंधुदुर्गमध्ये सापडते. येथे दरवर्षी नाटयमहोत्सवाचे आयोजन केले जाते.

चंदगड तालुक्यातील कोकण सीमेवर असलेली गावे जांबरे, उमगाव, पिळणी, सडे-गुडवळे इ. ठिकाणी जत्रेच्या वेळी कोकणातील दशावतार नाट्य मंडळे २०० कि.मी. प्रवास करुन दशावतार नाट्यकला सादर करतात. चंदगड पंचक्रोशीतील हौशी नाट्यप्रेमी हि कला पाहण्यासाठी पुर्ण रात्र जागतात हे विशेष आहे. या नाटयप्रयोगातुन समाज प्रबोधनाचा संदेश दिला जातो.

कोकण सीमा भागातील ग्रामीण युवकामध्ये दशावतार कलेचा ध्यास आहे. जुन्या पिढीतील जांबरे गावातील कै. विश्राम बाबली गावडे (अष्टपैलू दशावतार कलाकार), कै. धाकू रेडकर (खलनायक पात्र), कै. दत्तु गावडे (ऋषीमुनी पात्र) आदींच्या अंगात दशावतार कला नसा-नसात भिनलेली होती. या दशावतार प्रयोगाव्दारे त्यांनी रसिक मायबापांची मने जिंकलेली होती. त्यानंतरच्या पिढीमध्ये कै. तानाजी निळकंठ गावडे (उत्कृष्ट खलनायक), श्री. नामदेव गणपती गावडे (राजपात्र), श्री. बाबली गोवेकर (स्त्री पात्र) आदी कलाकारांनी कोणतीही साधने नसताना केवळ ऐतिहासिक अभ्यासाच्या जोरावर ही दशावतार कला समृध्द केली होती. या दशावतार कलेला सुरांची संगीत साथ श्री. लक्ष्मण गावडे (मा. सरपंच), श्री. रामा कांबळे व श्री. गुंडू कांबळे यांनी देवून या दशावतार नाट्याला बहर आणला होता. तर नविन पिढीमध्ये श्री. रामचंद्र बाबली गावडे (उत्कृष्ट खलनायक), रामकृष्ण निंगाप्पा गावडे (विनोदी पात्र), सुनिल मारुती गावडे (नारद मुनी) इत्यादींनी दशावतर कला जोपासण्यासाठी आपले योगदान दिले आहे. त्यामुळे या कलेच्या प्रसारासाठी सांस्कृतिक मंच व प्रेक्षकासाठी खुला मंच तयार करुन, रात्री हा प्रयोग सादर करुन पर्यटन हंगामात दरवर्षी दशावतार नाट्यमहोत्सवाचे आयोजन केले आणि हि लोककला पर्यटन क्षेत्रांशी जोडली, तर पर्यटकांचा ओघ नक्कीच चंदगडच्या भूमीत अवतरेल यात शंका नाही. परिणामी स्थानिक कलाकारांना रोजगार उपलब्ध होईल.

**चंदगडचा शिगमोत्सव**

चंदगडचा शिगमोत्सव हा पारंपारिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृध्द आहे. आठवडाभर चालणारा हा सोहळा समृध्द कोकण संस्कृतीचे व सामाजिक एकतेचे दर्शन घडवतो. हा उत्सवव पाहण्यासाठी आजरा, गडहिंग्लजसह, कोल्हापूर, बेळगाव, गोवा आणि कोकण परिसरातील लोक येतात. त्यामुळे या उत्सवाला प्रादेशिक स्तरावरही मोठे महत्व प्राप्त झाले आहे.

शिगमोत्सवात घोडेमोडणी, गोफ, आदि लोकनृत्य व ढोल, ताशा, घुमटच्या गजरात पारंपारिक वेशभुषा व मुखवटे घालून कलाकार पौराणिक कथा व लोकपरंपरा दर्शविणारे देखावे सादर करतो. त्यामुळे का उत्सव ग्रामीण जीवनाचा उत्सव वाटतो. त्यामुळे चंदगडच्या पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी शिगमोत्सवाच्या माध्यमातून पर्यटकांना आकर्षित

करण्यासाठी लोककला व सोंगे स्पर्धा आयोजित करुन पर्यटन सुविधा विकसित केल्या पाहिजेत. त्यामुळे आपली सांस्कृतिक ओळख टिकेल व पर्यटक येथे स्थिरावतील.

**ग्रामीण खादय संस्कृती-रोजगाराचे आशास्थान -**

पश्चिम घाटात विविध प्रकारच्या रानभाज्या आढळतात. त्यापैकी महत्वाच्या म्हणजे – पाथर, आकर, रिंगणी, नाल, तोंड्या, मोरशेंडा, कुर्डू, बांबुचे कोंब इ. असुन त्या पौष्टिक आहेत. या भाज्या करण्याची विशिष्ट पध्दत आहे. हि कला अवघत असणारी स्त्रियांची एक पिढी आता कालौघात संपत चालली आहे. नव्या पिढीतील महिलांना था रानभाज्यांची फारशी माहिती नाही. तसेच चंदगडच्या पुर्वेकडील भाग कर्यात- येथे "मसुर" या तृणधान्याची ग्रामीण जीवन आणि स्थानिक अन्नसंस्कृतीमध्ये खास ओळख होती. बेळगांव, संकेश्वर, गडहिंग्लज या बाजारपेठेतून या कर्यात भागाच्या मसुरीची मोठी विक्री होत होती. परंतु बदलत्या जीवनशैलीमुळे ग्रामीण खाद्य संस्कृती अस्तित्वाच्या उंबरठ्यावर आहे. त्यामुळे याला पुर्न:जिवित करण्यासाठी पुन्हा एकदा आपण या पारंपारिक मुळ संस्कृतीकडे वळले पाहिजे. आज चुलीवरचे जेवण पर्यटकांना आकर्षण ठरते. अशा नाविण्य उपक्रमामुळे पर्यटकांना ग्रामीण संस्कृतीची ओळख होईल.

तसेच चंदगड तालुक्यातील बरेचसे युवक रोजगाराच्या निमित्ताने पुणे-मुंबई सारख्या मोठ्या शहरामध्ये मोठ्या हॉटेलमध्ये शेफचे (आचारी) काम करतात. त्यांनी आपली हि पाककला - कौशल्य ग्रामीण भागामध्ये खाद्य संस्कृतीच्या रुपाने पर्यटकांना उपलब्ध करून दिल्यास या संस्कृतीमध्ये बहर येईल. तरुणांचे भविष्य उज्वल बनेल. त्यामुळे पश्चिम घाटातील तृणधान्ये, रानभाज्या, फळे, रानमेवा आहारातील घटक बनला तर गावात शाश्वत रोजगार निर्माण होतील व तरुण सन्मानजनक जीवन जगेल. त्यामुळे होमस्टे अशा सुविधांनी अनुकूल वातावरण पर्यटकांना उपलब्ध करुन दिल्यास या संस्कृतीच्या रुपाने पर्यटनास चालना मिळू शकते.

**निष्कर्ष -**

पश्चिम घाटातील चंदगड येथे जैवविविधता विपुल असल्याने त्याच्या जतन- संवर्धनातुन पर्यावरणाचा समतोल साधत पर्यटन वृध्दीच्या दृष्टीने हि नैसर्गिक विविधतेची ठिकाणे सौंदर्यदृष्टीने व पायाभूत सुविधेने तरुणामध्ये जनजागृती करुन विकसित केल्यास चंदगडच्या विकासात भर पडू शकते. कारण पर्यटकांना स्वच्छ, सुंदर पर्यावरण व पायाभूत सुविधा महत्वाच्या असतात. त्याचा विचार केल्यास आंबोली, चौकुळ व तिलारी चंदगड हा त्रिकाणी निसर्ग समृध्द पट्टा रस्ते बांधणीने जोडल्यास पर्यटनाला दिशा मिळेल. परिणामी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलबध्द होतील यात शंका नाही.

**संदर्भ -**

१. कोल्हापूर जिल्हा गॅझेटियर - महाराष्ट्र शासन.
२. दैनिक सकाळ, कोल्हापूर आवृत्ती, 2026.
३. डॉ. शंकरराव पाटील – पर्यावरण आणि शाश्वत विकास.
४. श्री. भगवान चिले – गडकोट, शिवस्पर्श प्रकाशन, कोल्हापूर.
५. पर्यावरण अभ्यास, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.
६. मुलाखत – श्रीमती. लक्ष्मीबाई विश्राम गावडे, 2026